# Savitribai Phule Pune University
## Internal Quality Assurance Cell
### Aavishkar University Level Research Competition Schedule 2026-27

| Sr. No. | Date / Time | Competition Venue | Place | Subject | | IQAC Director | Cordinator Name & Contact No. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 18-11-2026 9.00 am | Savitribai Phule Pune University Department of Computer Science | Pune | Engg. & Technology | Agri & A. H. | Prof. Dr. Vinayak Joshi | Prof. Dr. Pragati Thakur 7720003492 Prof. Dr. Rajesh Gacche 9423656179 |
| 2 | 19-11-202 9.00 am | Savitribai Phule Pune University Department of Computer Science | Pune | Medicine & Pharmacy | Pure Sciences | Prof. Dr. Vinayak Joshi | Prof. Dr. Pragati Thakur 7720003492 Prof. Dr. Rajesh Gacche 9423656179 |
| 3 | 20-11-2026 9.00 am | Savitribai Phule Pune University Department of Computer Science | Pune | Humanities & Languages | Comm, Management & Law | Prof. Dr. Vinayak Joshi | Prof. Dr. Pragati Thakur 7720003492 Prof. Dr. Rajesh Gacche 9423656179 |

* विद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धेसाठी निवड झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी नियोजित वेळापत्रकानुसार स्पर्धेच्या दिवशी सकाळी ९.०० वाजता संगणकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११००७ येथे उपस्थित राहणे अनिवार्य आहे.
* **विद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धेसाठी निवड झालेल्या सहा संशोधन विषय गटांतील (UG/PG/PPG) प्रत्येक प्रकल्पासाठी केवळ एकाच संशोधक विद्यार्थ्यास उपस्थित राहून आपल्या संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण करता येईल. एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.**
* संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण करण्यासाठी १ मीटर × १ मीटर आकाराचा फ्लेक्स पोस्टर तसेच संबंधित संशोधनाचे मॉडेल (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक आहे.
* संशोधन विद्यार्थ्यांनी सादरीकरणासाठी लावण्यात येणाऱ्या पोस्टरवर स्वतःचे नाव, महाविद्यालयाचे नाव, विद्यापीठाचे नाव अथवा स्वतःची ओळख पटेल असे कोणतेही नाव, चिन्ह, लोगो किंवा इतर ओळखदर्शक माहिती नमूद करू नये.
* विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या संशोधन प्रकल्पांना स्पर्धेच्या ठिकाणी स्वतंत्र संशोधन कोड देण्यात येईल. सादरीकरण व मूल्यमापनादरम्यान संबंधित संशोधन कोडचाच वापर करावा.
* विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या संबंधित परिपत्रकानुसार निवड झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांपैकी केवळ संबंधित प्रकल्पासाठी अधिकृतरीत्या निवड झालेल्या विद्यार्थ्यालाच स्पर्धेत सहभागी होता येईल. अन्य कोणत्याही विद्यार्थ्यास पर्यायी स्वरूपात सहभागी होता येणार नाही.
* मा. प्राचार्य, संचालक, विभागप्रमुख, शिक्षक, पालक अथवा संशोधन समन्वयक (ARC) यांनी संशोधन प्रकल्पाच्या सादरीकरणाच्या ठिकाणी उपस्थित राहू नये. संशोधन सादरीकरण व मूल्यमापन प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येणार नाही.
* संशोधक विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या ठिकाणी प्रवेश मिळविण्यासाठी महाविद्यालयाचे वैध ओळखपत्र सोबत बाळगणे अनिवार्य आहे. ओळखपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.
* विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या संशोधक विद्यार्थी स्पर्धकांची यादी विद्यापीठाच्या संबंधित परिपत्रकासोबत प्रसिद्ध करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धेची माहिती देणे, त्यांना वेळेत उपस्थित राहण्याबाबत सूचित करणे व आवश्यक समन्वय साधणे ही संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या संशोधन समन्वयकांची (ARC) राहील.
* **विद्यापीठस्तरीय 'आविष्कार' संशोधन स्पर्धेत संशोधक विद्यार्थी स्पर्धकांची अंतिम निवड ही तज्ज्ञ परीक्षकांच्या शिफारशीनुसार करण्यात येणार आहे. सदर निवड प्रक्रियेबाबत संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांचा निर्णय अंतिम राहील. यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप अथवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**वरील सर्व सूचनांचे सर्व संशोधक विद्यार्थी, मा. प्राचार्य, संचालक, विभागप्रमुख, शिक्षक व संशोधन समन्वयक यांनी काटेकोरपणे पालन करावे.**

**Principal Dr. Devidas Waydande**
Chairman
Aavishakr Research Committee
Savitribai Phule Pune University

**Prof. Dr. Vinayak Joshi**
Director
Internal Quality Assurance Cell
Savitribai Phule Pune University,
Pune 411007

**Date : 12-11-2026**